मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवड शहरात पाणीटंचाई गंभीर!

## नागरिकांना तातडीने पुरेसे पाणी द्या : आमदार जगताप यांचे प्रशासनाला निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात सोसायट्यांना कडक उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पुरेशा पाण्याचा तुटवडा भासत असल्याने आमदार शंकर जगताप यांनी बैठक घेत प्रशासनाला चांगलेच सुनावले. पाण्याची गळती आणि अपव्यय रोखून नागरिकांना त्वरित समाधानकारक पाणीपुरवठा करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक सोसायट्यांना सध्या निर्धारित कोट्यापेक्षा कमी पाणी मिळत असून, नागरिकांना टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ आली आहे. कडक उन्हाळ्यात पाण्याच्या या संकटामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार शंकर जगताप यांनी चिंचवडगावात पाण्याच्या टाकी खाली महत्त्वपूर्ण बैठक घेतली.



या बैठकीत जगताप यांनी पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सुनावले. पाण्याची गळती, गैरवापर व अपव्ययाबाबत त्यांनी नाराजी व्यक्त करत तातडीने उपाययोजना राबवण्याचे आदेश दिले. व्यावसायिक वापराच्या तुलनेत पिण्याच्या पाण्याला पूर्ण प्राधान्य देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

"पिण्याचे पाणी हा नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिक आणि सोसायटीला नियमानुसार व पुरेसे पाणी मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रशासनाने तातडीने कामाला लागावे," असे स्पष्ट निर्देश आमदार जगताप यांनी दिले.

बैठकीस भाजपा जिल्हा सरचिटणीस नामदेव ढाके, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, माजी नगरसेवक सुरेश भोईर, माजी नगरसेविका अश्विनी चिंचवडे, माधुरी कुलकर्णी, माजी स्वीकृत नगरसेवक बिभीषण चौधरी, विठ्ठल भोईर, भाजपा उपाध्यक्ष शेखर चिंचवडे तसेच इतर स्थानिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रशासनातर्फे पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता प्रमोद ओंबासे, सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता दीपक पाटील, उपअभियंते चंद्रकांत मोरे व देसाई, कनिष्ठ अभियंता साकेत पावरा तसेच रघुनाथ शेमले, राहुल पाटील, सागर पाटील, संदीप ढेपले, शरद मोरे आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीत नागरिकांचे प्रश्न गांभीर्याने घेत तातडीने त्यावर कारवाई करण्याचे आश्वासनही अधिकाऱ्यांनी दिले. यामुळे नागरिकांत समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

---

# "टीपी स्कीम"वरून कुदळवाडी, चिखली परिसरातील नागरिक आक्रमक

## स्थानिकांकडून कागदपत्रांची होळी : ग्रामस्थ तीव्र आंदोलनाच्या भूमिकेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील कुदळवाडीमध्ये दोन महिन्यांपूर्वी अतिक्रमण कारवाई करण्यात आली. या कारवाईत सुमारे 825 एकर जमिनीवर बुलडोझर फिरवण्यात आला. प्रदूषणाच्या आणि सुरक्षिततेच्या मुद्द्यावर ही कारवाई झाली असल्याचे सांगण्यात आले आणि त्यानंतर लगेचच महापालिकेने टीपी स्कीम (शहर विकास आराखडा)

राबवण्याच्या हालचाली सुरू केल्या. याबाबतचे जाहीर प्रकटनही देण्यात आले. मात्र याची माहिती लोकप्रतिनिधी तसेच ग्रामस्थ यांना देण्यात आली नाही. ग्रामस्थांना अंधारात ठेवून नवीन शहर विकास आराखडा लादला जात असल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी सोमवारी या टीपी स्कीमच्या जाहिर प्रकटन कागदपत्रांची होळी केली. ग्रामस्थांना विचारात न घेता टीपी लादला गेला तर आक्रमक भूमिका घेतली जाईल असेही ग्रामस्थांनी यावेळेस सांगितले.

पिंपरी चिंचवड शहरामध्ये कुदळवाडी, चिखली आणि जाधववाडी परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात लघुउद्योजक व्यवसाय करत होते .त्या ठिकाणी भंगार मालाची गोदामे मोठ्या प्रमाणात होती. भंगार व्यवसायिकांमुळे शहरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. याशिवाय या भागात बांगलादेशी रोहिंगे असल्याचा संशयही वारंवार व्यक्त करण्यात आला. याबाबत ठोस कारवाई करणे गरजेचे आहे असा मुद्दा समोर आणल्यानंतर महापालिकेने



अनधिकृत पत्रा शेड, गोदामे यांच्यावर कारवाई केली. कुदळवाडी, चिखलीगाव, जाधववाडी परिसरातील 825 एकर जमिनीवर बुलडोझर फिरवण्यात आला.

या कारवाईनंतर येथील व्यावसायिक स्थानिक नागरिकांनी आक्रमक भूमिका घेतली. मात्र प्रशासनाकडून अनधिकृत बांधकामनावर कारवाई केल्याचे सांगण्यात आले. त्यांनंतर आता महापालिकेने नगर रचना योजनेची जाहिरात प्रसिद्ध केली आणि "टीपी" च्या हालचाली सुरू झाल्या. यामुळे नागरिकांनी देखील आक्रमक भूमिका घेत. आराखड्याला विरोध दर्शवला

**महापालिकेच्या जाहीर प्रकटनाची होळी**

**» आमचा जीव गेला तरी बेहत्तर पण "टीपी" होऊ देणार नाही, अशा अत्यंत कठोर शब्दांत ग्रामस्थांनी भावना व्यक्त केल्या. महापालिका प्रशासनाचा निषेध म्हणून टीपी स्किम बाबत महापालिकेने दिलेल्या जाहीर प्रकटनाची होळी यावेळी करण्यात आली.**

आहे. यासंदर्भात सोमवारी कुदळवाडी येथील विठ्ठल रुक्मिनी मंदिरात यासंदर्भात बैठक झाली. आणि "टीपी स्कीम"ला विरोध करण्यासाठी तीव्र जनआंदोलन उभारण्याचा निर्णय करण्यात आला.

बैठकीसाठी भाजपचे युवा कार्यकर्ते दिनेश यादव, जेष्ठ उद्योजक बाळासाहेब यादव, लघुउद्योग संघटनेचे माजी अध्यक्ष तात्या सपकाळ, मराठा महासंघाचे उदय पाटील यांच्यासह युवराज पवार, दिलीप यादव, रमेश मोरे, दत्तूनाना मोरे, शैलेष मोरे, बाळासाहेब हरगुडे, गुलाबराव बालघरे, कोंडिबा यादव, विशाल बालघरे, कमालकर बालघरे, मनोज मोरे, दादासाहेब मोरे, गणेश यादव, नितेश मोरे, माऊली मोरे, सुदाम पवार, विशाल नेवाळे, तानाजी बालघरे, राहुल यादव, संभाजी यादव, दीपक ठाकूर, उत्तम बालघरे आदींसह सुमारे 300 हून अधिक ग्रामस्थ उपस्थित होते.

# पुणे विभागाच्या निकालात तीन टक्क्यांनी घट

## पुणे विभागाचा निकाल 91.32 टक्के : 94.87 टक्क्यांसह पुणे जिल्ह्याची आघाडी

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेच्या निकालात पुणे विभागाचा निकाल ९१.३२ टक्के लागला. गेल्यावर्षीच्या तुलनेत विभागाचा निकाल तीन टक्क्यांनी घटला असून, विभागात ९४.८७ टक्क्यांसह पुणे जिल्ह्याने अग्रस्थान पटकावले. मुलांच्या तुलनेत मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण अधिक आहे.



पुणे विभागीय मंडळाने बारावीच्या निकालाची माहिती दिली. विभागातील २ लाख ४४ हजार २९४ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. परीक्षा दिलेल्या २ लाख ४२ हजार ६७१ विद्यार्थ्यांपैकी २ लाख २१ हजार ६३१ विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले. गेल्यावर्षी विभागाचा निकाल ९४.४४ टक्के लागला होता. तर पुणे जिल्ह्याचा निकाल ९५.१९ टक्के, अहिल्यानगर जिल्ह्याचा निकाल ९३.४० टक्के आणि सोलापूर जिल्ह्याचा निकाल ९३.८८ टक्के लागला होता. यंदा पुणे जिल्ह्याचा निकाल ९४.८७ टक्के, अहिल्यानगर जिल्ह्याचा निकाल ८६.३४ टक्के, तर सोलापूर जिल्ह्याचा ८८.३२ निकाल लागला आहे. त्यामुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा एकूण निकालात घट झालेली असताना विभागातील पुणे, सोलापूर, अहिल्यानगर या तीनही जिल्ह्यांच्या निकालातही घट झाली आहे.

पुणे जिल्ह्यातून नोंदणी केलेल्या १ लाख २७ हजार ९६४ विद्यार्थ्यांपैकी १ लाख २७ हजार ३८७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यातील ९४.८७ टक्के अर्थात १ लाख २० हजार ८५४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. अहिल्यानगर जिल्ह्यातून नोंदणी केलेल्या ६१ हजार ४५५ विद्यार्थ्यांपैकी ६० हजार ९३१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी ५२ हजार ६०९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. सोलापूर जिल्ह्यात ५४ हजार ८७५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. यापैकी ५४ हजार ३५३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर ४८ हजार १६८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विज्ञान शाखेचा निकाल ९७.०१ टक्के, वाणिज्य शाखेचा ९२.३२ टक्के, कला शाखेचा ७४.२४ टक्के, व्यावसायिक अभ्यासक्रम शाखेचा ८४.१५ टक्के, आयटीआयचा ७२.०३ टक्के निकाल लागला आहे.

**विभागनिहाय निकालाची टक्केवारी -**

कोकण विभाग – 96.74%
कोल्हापूर विभाग – 93.64%
मुंबई विभाग – 92.93%
संभाजीनगर विभाग – 92.24%
अमरावती विभाग – 91.43%
पुणे विभाग – 91.32%
नाशिक विभाग – 91.31%
नागपूर विभाग – 90.52%
लातूर विभाग – 89.46%

### गैरप्रकारांमध्ये घट

**» कॉपीमुक्त अभियानामुळे विभागातील गैरप्रकारांची संख्या यंदा कमी झाल्याचे दिसून आले आहे. गेल्यावर्षी विभागात ९५ गैरप्रकारांची नोंद झाली होती. तर यंदा ६६ गैरप्रकार नोंदवण्यात आले असल्याची माहिती मंडळाने दिली.**

---

# 'उजनी' तील वैभवशाली पाऊलखुणा पाण्याबाहेर

## प्राचीन अवशेष पाहण्यासाठी पर्यटकांची पावले उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्राकडे वळू लागली

**पुणे | प्रतिनिधी**

उजनी धरणातील पाणी पातळी खालावल्याने इनामदारांचा वाडा,प्राचीन पळसनाथ मंदीर,डिकसळचा ब्रिटिशकालीन पुल पाण्याबाहेर आला असून प्राचीन अवशेष पाहण्यासाठी पर्यटकांची पावले उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्राकडे वळू लागली आहेत. उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पाण्यात बुडालेल्या अवस्थेत असलेल्या व सध्या उजनी जलाशयाची पाणी पातळी खालावल्याने कुगाव येथील इनामदार वाडा, पळसदेव येथील पळसनाथाचे प्राचीन मंदिर, ब्रिटिशकालीन डिकसळ चा पुल पाण्याबाहेर डोकावू लागले आहेत.



गतवर्षी सुद्धा हे अवशेष पूर्णपणे पाण्याबाहेर आले होते. पाणीसाठा कमी झाल्याने या प्राचीन स्थापत्य कलेचा अनुभव नागरिकांना घेता आला. त्यानंतर पडलेल्या मुबलक पावसामुळे धरण क्षेत्रातील पाणीसाठ्यात वाढ झाली आणि पुन्हा हे सर्व अवशेष पाण्याखाली गेले.सध्या धरणातील उपयुक्त पाणीसाठा संपुष्टात आल्याने धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील कुगाव येथील इनामदार वाडा, पळसदेव येथील पळसनाथाच्या मंदिर पाण्याबाहेर आले आहे.तर ब्रिटिश कालीन डिकसळ चा पूल पाण्याबाहेर उघडा पडला आहे.

उजनी धरणाच्या बांधणी नंतर जुन्या पळसदेव गावाला जलसमाधी मिळाली होती. भीमा नदीच्या खोऱ्यामध्ये अनेक प्राचीन काळातील गावे वसलेली असल्याने त्या गावच्या ऐतिहासिक पाऊलखुणा आजही दिमाखदार,व वैभवशाली परंपरेची साक्ष ठरतात.

चारशे वर्षांपूर्वीचा इनामदार वाडा पाण्याबाहेर दिसू लागला आहे. सैराट चित्रपटाचे चित्रीकरण येथे झाल्यानंतर हा वाडा आणखीनच प्रकाश झोतात आला. छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांना सरहद्दीवरील शत्रूंचा बंदोबस्त करण्याची कामगिरी मालोजीराजेंवर सोपविली.भीमा नदी काठाच्या कुगाव या ठिकाणी सैन्यांना रसद मिळण्यासाठी मदत व्हावी म्हणून किल्ला बांधला. सध्या हा किल्ला उजनी परिसरातील पाणी कमी झाल्याने उघडा पडू लागला आहे. फक्त उन्हाळ्यातच हा किल्ला उघडा पडत असल्यामुळे शिवप्रेमी नागरिक, पर्यटक हा किल्ला पाहण्यासाठी मोठ्या संख्येने इकडे येत आहेत. सैराट मुळे किल्ला पर्यटकासमोर आला आहे. नागराज मंजुळे यांनी सैराट चित्रपटातील काही प्रसंग या वाड्यावर चित्रित केले होते. त्यामुळे हा किल्ला पर्यटका समोर येऊन आता तिथे गर्दी होऊ लागली आहे.

### डिकसळचा पूल उघडा..

**» ब्रिटिश काळातील इंदापूर व करमाळा तालुक्याच्या सीमेवर असलेला ब्रिटिशकालीन डिकसळचा पूल भीमा नदीपात्रातून पूर्णपणे उघडा पडला आहे. तब्बल एकशे पासष्ट वर्षांपूर्वी ब्रिटिशांनी बांधलेल्या डिकसळच्या पुलावरून दक्षिणोत्तर राज्यांना दळणवळणाच्या सोयीच्या दृष्टीने जोडणारा रेल्वे मार्ग होता. ब्रिटिशकालीन डिकसळ पुलाचे देखणे रूप नदीपात्रातील पाणी कमी झाल्याने पर्यटक व प्रवाशांना आकर्षित करत आहे.**

# शिरूर परिसरामध्ये धर्मांतराच्या कारस्थानाचा बंदोबस्त!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या आक्रमक भूमिकेनंतर सात जणांवर गुन्हा



**पिंपरी | प्रतिनिधी**

शिरूर टाकळीहाजी (ता. शिरूर) येथील परिसरातील उचाळेवस्ती येथे हिंदू देवतांबद्दल अपशब्द व अपमानास्पद भाष्य करणे आणि ख्रिश्चन धर्मात येण्यासाठी दबाव टाकण्यात आला. यानंतर भेदरलेल्या संबंधित कुटुंबाने पोलिसांकडे धाव घेतली. मात्र, पोलिसांनी हात वर केल्यानंतर हा प्रकार भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या कानावर घालण्यात आला. अखेर या धर्मांतराच्या कारस्थानाचा बंदोबस्त करण्यात आला.

आमदार लांडगे यांनी आक्रमक भूमिका घेतल्यानंतर ख्रिश्चन धर्मात येण्यासाठी मतपरिवर्तन केल्याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात सात जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, शिरूर परिसरामध्ये अशाप्रकारे ठराविक धर्मात येण्यासाठी नागरिकांवर आमिष आणि दबाव आणला जात आहे. नागरिकांचे मत परिवर्तन करण्यासाठी काही मंडळी गावागावात फिरत असल्याचा आरोप बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे.

ख्रिश्चन धर्मात येण्यासाठी दबाव आणल्या प्रकरणी शेतकरी राहुल मारुती गायकवाड (वय ३९, रा. उचाळेवस्ती-टाकळीहाजी, ता. शिरूर, जि. पुणे) यांनी शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याप्रकरणी प्रशांत जालिंधर घोडे (रा.उचाळेवस्ती-टाकळी हाजी, ता. शिरूर, जि. पुणे), मोजस बार्बनबस डेव्हिड (रा.२०४ लिव्ह गॅलेक्सी, गोकुळ सोसायटी, डोरेबाळा रोडनागपुर ता. जि. नागपुर), अमोल विठ्ठलराव गायकवाड (रा. प्लॉट नं. १४६९, आयुषी अपार्टमेंट, न्यु नंदनवन नागपुर, ता. जि. नागपुर), योगेश संभुवेल रक्षत (रा.६/१७, रामबाग कॉलनी, मेडीकल चौक नागपुर, ता. जि. नागपुर), जेसी ऍलिस्टर अँथोनी (रा.२०२ गणराज फोर रेसिडेन्सी, टाकळी, नागपुर, ता.जि. नागपुर), कुणाल जितेश भावणे (रा. बाजारचौक-आंधळगाव, ता. मोहोळ, जि. भंडारा), सिध्दांत सदार कांबळे (रा. रेड्डी इन क्लब मुंढवा, केशवनगर, हनुमान नगर, पुणे) या सात आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे.

शिरूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी (१ मे रोजी) सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास राहुल गायकवाड हे आपल्या कुटुंबासोबत घरासमोर बसले होते. यावेळी प्रशांत जालिंदर घोडे व त्याच्यासोबत सहा अनोळखी व्यक्ती त्यांच्या घरी आले. "तुम्ही कोणत्या धर्माचे?" अशी विचित्र चौकशी करत,"बायबल वाचा, चर्चमध्ये या, तुमच्यावर प्रभु येशूची कृपा होईल," असे सांगत धर्मपरिवर्तनासाठी दबाव टाकला." तुमच्या देवांनी काय केलं?" असा सवाल करत, सात जणांचे टोळके उचाळेवस्ती येथील गायकवाड कुटुंबाच्या दारात येऊन बसला! "प्रभु येशूला मान्य करा, चर्चमध्ये या, आर्थिक फायदा होईल असे अमिष दाखवले. त्यानंतर भेदरलेल्या गायकवाड कुटुंबीयांनी पोलिसांकडे धाव घेतली. सुरुवातीला पोलिसांनी या घटनेबाबत दखल घेतली नाही. मात्र, आमदार महेश लांडगे यांच्या कानावर हा प्रकार जातच त्यांनी आक्रमक भूमिका घेतली. त्यानंतर शिरूर पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

**धर्मपरिवर्तनासाठी गावागावात नागरिकांवर दबाव...**

» शिरूर परिसरामध्ये वारंवार धर्म परिवर्तनासाठी दबाव आणला जात आहे. मात्र पोलिसांकडून याबाबत योग्य कारवाई केली जात नाही. वेळीच कारवाई होत नसल्यामुळे धर्म परिवर्तनासाठी फिरणाऱ्या लोकांचे फावले आहे, असा आरोप बजरंग दलाच्या वतीने करण्यात आला आहे. पोलिसांनी अशा प्रकारांवर तातडीने गुन्हा दाखल करावा अशी मागणी करण्यात येत आहे.

“ धर्म परिवर्तन करण्यासाठी नागरिकांवर दबाव आणणे. त्यासाठी गावागावात फिरणे. हिंदू देवदेवतांचा अपमान करणे. अवमानकारक भाषा वापरणे हे सर्व प्रकार जाणीवपूर्वक केले जात आहेत. अशा प्रकाराबाबत तक्रार आल्यानंतर पोलिसांनी याबाबत कडक कारवाई तात्काळ करणे अपेक्षित आहे. वेळीच असे प्रकार रोखले नाही तर समाजातील अनुचित घटना वाढत जातील. राज्य सरकारनेही या प्रकाराची दखल घेतली आहे.

**- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# कुदळवाडी ग्रामस्थ आक्रमक, टीपी प्लॅनची कॉपी जाळली

## तीन महिन्यापूर्वी कडेकोट पोलिस बंदोबस्तात कुदळवाडीत बुलडोझर कारवाई करण्यात आली



**पिंपरी | प्रतिनिधी**

तीन महिन्यापूर्वी कडेकोट पोलिस बंदोबस्तात कुदळवाडीत बुलडोझर कारवाई करण्यात आली. प्रत्यक्षात ही कारवाई टीपी प्लॅनसाठीच असल्याचा इरादा महापालिकेने जाहीर केल्यानंतर ग्रामस्थ संतापले आहेत. कुदळवाडीतील ग्रामस्थांची यात प्रचंड बदनामी झाली, लोक बेरोजगार झाले, उद्योगधंदे बंद पडले, कोट्यवधींचे आर्थिक नुकसान झाले आणि आता टीपी योजनेसाठीच ही कारवाई रचल्याचे उघड झाल्याचे सांगत गावकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.

आज (दि.०५) सकाळी विठ्ठल रुक्मिनी मंदिरात यासंदर्भात बैठक झाली आणि टीपी स्किमला विरोध करण्यासाठी तीव्र जनआंदोलन उभारण्याचा निर्णय करण्यात आला. आमचा जीव गेला तरी बेहत्तर पण टीपी स्किम होऊ देणार नाही, अशा अत्यंत कठोर शब्दांत ग्रामस्थांनी भावना व्यक्त केल्या. महापालिका प्रशासनाचा निषेध म्हणून टीपी स्किमचे जाहीरात यावेळी जाळण्यात आली. आम्हाला भूमिहिन करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचाच आम्ही खात्मा करू असा पवित्रा सर्वांनी घेतल्याने वातावरण तापले.

सकाळी सुरू झालेल्या या बैठकीत जोरदार भाषणे झाली.

टीपी ला विरोध करायचा असे ठरले. यापूर्वी चिखली कुदळवाडीच्या जमिनी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणात गेल्या. महापालिकेच्या आरक्षणात मोठे क्षेत्र गेले. स्वस्त घरकूलासाठी १०० एकर क्षेत्र घेतले. आता कुठे बरे चालले होते तर टीपी योजना आणली. कारवाईला सर्व स्थानिकांनी मिळून एकमुखाने विरोध करायचे ठरले आणि त्यासाठी वाट्टेल ती किंमत मोजू, असा इशाराही देण्यात आला. आता टीपीस्किम करून भूमिहिन करणार असाल तर ते आम्ही कदापि सहन करणार नाही, असे निक्षून सांगण्यात आले.

बैठकीसाठी भाजपचे युवा कार्यकर्ते दिनेश यादव, जेष्ठ उद्योजक बाळासाहेब यादव, लघुउद्योग संघटनेचे माजी अध्यक्ष तात्या सपकाळ, मराठा महासंघाचे उदय पाटील यांच्यासह युवराज पवार, दिलीप यादव, रमेश मोरे, दत्तूनाना मोरे, शैलेश मोरे, बाळासाहेब हरगुडे, गुलाबराव बालघरे, कोंडिबा यादव, विशाल बालघरे, कमालकर बालघरे, मनोज मोरे, दादासाहेब मोरे, गणेश यादव, नितेश मोरे, माऊली मोरे, सुदाम पवार, विशाल नेवाळे, तानाजी बालघरे, राहुल यादव, संभाजी यादव, दीपक ठाकूर, उत्तम बालघरे, किशोर बालघरे, जितेंद्र यादव, दिलीप मोरे, बाळासाहेब मोरे आदी सुमारे ३०० ग्रामस्थ उपस्थित होते.

# औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर

## उद्योगांची प्रदूषण नियंत्रण मंडळासह चाकण नगर परिषदेबरोबर संयुक्त बैठक

**पुणे | प्रतिनिधी**

चाकण परिसरात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या बांधकामामुळे वाढलेले हवा प्रदूषण, नाल्यांतून थेट नदीत सांडपाणी मिसळत असल्याने होणारे जलप्रदूषण यावर ठोस पावले उचलण्याची मागणी उद्योगांच्या वतीने शासकीय यंत्रणांसमोर करण्यात आली. याचबरोबर पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी योगदान देण्याची भूमिकाही उद्योगांच्या प्रतिनिधींनी घेतली.

'फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीज'च्या वतीने चाकणमधील पर्यावरणाशी निगडित समस्यांवर चर्चा करण्यासाठी विविध शासकीय यंत्रणांबरोबर नुकतीच बैठक घेण्यात आली. या बैठकीत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे, प्रादेशिक अधिकारी जगन्नाथ साळुंखे, चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, चाकण वनपरिक्षेत्राचे अधिकारी संतोष कांत यांच्यासह चाकणमधील सुमारे ७० कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



या बैठकीत फेडरेशनचे मुख्याधिकारी दिलीप बटवाल यांनी चाकणमधील पायाभूत सुविधांसह प्रदूषणाची समस्या मांडली. ते म्हणाले, 'चाकण परिसरातील ओढे नदीला येऊन मिळतात आणि या पाण्यावर कुठलीही प्रक्रिया होत नाही. त्यामुळे नाल्यातील पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बसवावेत. नदीतील जलपर्णी काढण्यासाठी यंत्राची आवश्यकता आहे. चाकण परिसरात मोठ्या प्रमाणात बांधकामे होत असून धूळ पसरली आहे. हे प्रदूषण थांबवण्यासाठी फॉगर यंत्राची आवश्यकता आहे. प्लास्टिकच्या बाटल्या रस्त्यात व इतरत्र फेकलेल्या असतात. हे थांबविण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी प्लास्टिक बाटल्या नष्ट करणारी यंत्रे बसविण्यात यावीत.'

> "वाढते औद्योगिकीकरण आणि नागरीकरणामुळे समस्या निर्माण होत आहेत. त्या सोडविण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. याचबरोबर समस्या निर्माणच होऊ नये, यासाठीही काम करणे आवश्यक आहे. आम्ही या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करू.
>
> **- जगन्नाथ साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**

'चाकण औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांपैकी केवळ एक कंपनी चाकण नगर परिषदेच्या हद्दीत आहे. इतर सर्व कंपन्या परिसरातील १९ ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये आहेत. त्यामुळे या कंपन्यांतून चाकण नगर परिषदेला काहीच उत्पन्न मिळत नाही. परंतु या कंपन्यांमधील कामगार आणि अधिकारी चाकण परिसरात वास्तव्यास असल्याने नागरीकरण वाढले आहे. यातून पाणी, कचरा व्यवस्थापन, रस्ते आदी पायाभूत सुविधांवर ताण येत आहे. निधीअभावी ही कामे करण्यात चाकण नगर परिषदेला मर्यादा येत असल्याने कंपन्यांनी त्यांच्या सामाजिक दायित्व निधीतून या समस्या सोडविण्यासाठी पुढे यावे,' अशी भूमिकाही बैठकीत मांडण्यात आली. घातक कचरा विल्हेवाटीसाठी आणखी कंपन्यांना परवानगी देण्याचीही मागणी बैठकीत करण्यात आली.

# पुरंदर विमानतळ विरोधात शेतकरी आक्रमक

## आंदोलनाला हिंसक वळण शेतकऱ्यांकडूनही दगडफेक : अनेक जखमी

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, एखतपूर, मुंजवडी, कुंभारवळण, खानवडी आणि पारगाव या सात गावांमधून २ हजार ६७३ हेक्टर इतके भूसंपादन करण्यात येणार आहे. याविरोधात सात गावांतील शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. सात गावांत होणाऱ्या भूसंपादनापैकी एखतपूर या गावातील जमिनींच्या संपादनासाठीचे ड्रोन सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले. मात्र, या सर्वेक्षणाला ग्रामस्थांना विरोध दर्शवीत काल ड्रोनच फोडल्याचे समोर आले आहे. तर आज जमिनी मोजण्यासाठी आलेल्या पथकाला गावात जाण्यासाठी ग्रामस्थांनी अडवणूक केली. त्यानंतर पोलिसांनी लाठीचार्ज केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तसेच या धक्काबुक्कीत एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप देखील गावकऱ्यांनी केला आहे. अंजनाबाई कामठे असं या वृद्ध महिलेचं नाव आहे.



ड्रोन सर्वेक्षण आणि जमीन मोजणी थांबवावी, अन्यथा शेतकरी आपले जीवन थांबवतील, असा इशारा ग्रामस्थांनी दिला होता. मात्र कालपासून ड्रोन सर्वेक्षण सुरु झाल्याने शेतकरी आक्रमक झाले आहेत. आज आलेल्या सर्वेक्षणाला ग्रामस्थांनी विरोध दर्शवला आहे. यावेळी पोलिसांकडून आमच्यावर लाठीचार्ज झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या. आमच्यावर गुन्हे दाखल केल्याचे त्यांनी सांगितले आहे. याआधी अनेक आंदोलने उपोषणे करूनही प्रशासनाने कोणतीही दाद दिली नाही. आता आमचा जीव गेला तरी चालेल पण माघार नाही अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे.

### ग्रामस्थांनी ड्रोन फोडले

**» विमानतळासाठीपुरंदर तालुक्यातील सात गावांपैकी एखतपूर या गावांत शुक्रवारी ड्रोन सर्व्हेला सुरुवात झाली होती. मात्र, ड्रोन सर्वेक्षण सुरू होत असताना स्थानिक शेतकऱ्यांच्या जमावाने ड्रोन फोडले. त्यामुळे सरकारी कामात अडथळा निर्माण झाला. त्यामुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे यांनी परिस्थितीचा अंदाज घेऊन दुपारी चार वाजेनंतर आणखी दोन ड्रोन कॅमेरे मागवून घेतले. त्याद्वारे पुन्हा ड्रोन सर्वेक्षण सुरू करून सायंकाळी ते सर्वेक्षण पूर्ण करण्यात आला. शेतकऱ्यांनी ड्रोन कॅमेरा फोडल्याने त्यांच्याविरोधात पोलिस प्रशासनाकडून गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू करण्यात आली होती.**

### हजारो लोकांचे संस्कार उद्ध्वस्त होणार

पुरंदर विमानतळ झाल्यास ते आमच्या प्रेतावरून होईल. शेतकरी विमानतळाला जमीन देणार नाहीत, हा आमचा निर्धार आहे. हा निर्धार पक्का असून, यासाठी आम्ही आज जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता. या विमानतळामुळे हजारो लोकांचे संस्कार उद्ध्वस्त होणार आहेत. जिल्ह्यात अनेक जागा उपलब्ध असून, तिथे विमानतळ करावे अशी ग्रामस्थांची मागणी आहे.